**नियमित दिवाणी दावा क्र.७८/२०१३**
**वादीतर्फे सा.क्र.**
**निशाणी क्र.६१ वर पुढे सुरु...**

शपथेवर पुढे सुरु –

**प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री. एस. टी. इंगळे यांच्यामार्फत उलटतपास**

१०. हे म्हणणे खरे आहे की, या आधी माझा न्यायालयामध्ये माझ्या सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल केलेले होते तसेच त्यावरील अंशतः उलटतपास झालेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, गेल्या तारखेला मी सदर प्रकरणामध्ये काही कागदपत्रे दाखल केलेली आहेत. हे म्हणणे खरे नाही की, त्यामध्ये मौजे पारस येथील जमीन सर्व्हे क्र.३४९/१ च्या मधील क्षेत्र ०.६१ आर हे क्षेत्र मी दत्तात्रय सिताराम मुगल यांना वाटपामध्ये आलेले क्षेत्र विक्री केलेले आहे. मी दि.०३.१०.२०२५ रोजी माझ्या वकीलांमार्फत सदर प्रकरणामध्ये मी कोणतेही दस्त दाखल केलेले नाहीत. दि.०३.१०.२०२५ रोजी सदर प्रकरणामध्ये माझ्या वकीलांनी खरेदीखताच्या २ प्रमाणित प्रती दाखल केलेल्या आहेत, याबाबत मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वकीलांनी दि.०३.१०.२०२५ रोजी दाखल केलेले कागदोपत्र खरे नाहीत. माझ्या वकीलांनी दि.०३.१०.२०२५ खरेदीखताच्या २ प्रमाणित प्रती दाखल केलेल्या आहेत, त्या खऱ्या आहेत. आता मला नि.क्र.६५ च्या यादीसोबत दाखल केलेल्या दि.२३.०४.१९८६ रोजीच्या खरेदीखताची प्रमाणित प्रत व दि.१६.०४.१९८८ रोजीच्या खरेदीखताची प्रमाणित प्रत दाखविण्यात आली. सदर खरेदीखताच्या प्रमाणित प्रती प्रतिवादीच्या वकीलांमार्फत साक्षीदार यास दाखविण्यात आल्याने त्यास अनुक्रमे **नि.क्र.७० व ७१** देण्यात येत आहे.

**न्यायालयीन प्रश्नः** तुम्हाला दिसते का ?

**उत्तरः** मला कमी दिसते. त्यामुळे मला वाचता येत नाही.

११. मला वाचून दाखविल्यास समजते. आता मला नि.क्र.७० मध्ये खरेदीखताचा मजकूर वाचून दाखविण्यात आला त्यामध्ये खरेदी घेणार दत्तात्रय सिताराम मुगल व खरेदी देणार प्रल्हाद लांडे म्हणजे मी यांनी मौजे पारस येथील सर्व्हे क्र.३४९/१ मधील ०.६१ आर ही जमीन विक्री केली, हा मजकूर वाचवून दाखविण्यात आला तो

मजकूर खरा आहे. सदर खरेदीखतातील मजकूर हा कायद्याप्रमाणे नमुद केलेला असून माझ्या सांगण्याप्रमाणे आहे व तो खरा व बरोबर आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर खरेदीखतात नमुद केलेले क्षेत्र हे माझ्या वडीलांकडून दि.१०.०२.१९८३ च्या वाटपानुसार मला मिळालेल्या जमीनीच्या क्षेत्रामधून ०.६१ आर विक्री केलेले आहे. आता मला नि.क्र.७१ मधील खरेदीखतातील मजकूर ''खरेदी देणार प्रल्हाद मोतीराम लांडे म्हणजे मी व संदीप मोतीराम लांडे अ.पा.क. आई अन्नपुर्णा व खरेदी देणार बाळीराम पुंडलिक इंगळे असे नमुद केलेले आहे.'' तो मजकूर बरोबर आहे. सदर खरेदीखतामध्ये नमुद केलेले नाव संदीप मोतीराम लांडे हा माझा लहान भाऊ आहे. तो सदर प्रकरणामध्ये मुळ प्रतिवादी क्र.३ आहे व अन्नपुर्णा मोतीराम लांडे ही माझी आई आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी व माझा भाऊ संदीप मोतीराम लांडे यांच्या तर्फे अ.पा.क. माझी आई यांनी सर्व्हे क्र.३४९/१ मधील ०.८१ आर हे क्षेत्र बळीराम पुंडलिक इंगळे यास विक्री केलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर खरेदीखतामधील विक्री केलेले क्षेत्र हे दि.१०.०९.१९८३ च्या माझ्या वडीलांनी केलेल्या वाटपामधील माझ्या हिश्शास आलेले व माझ्या भावाच्या हिश्शास आलेल्या क्षेत्रापैकी काही क्षेत्र सदर खरेदीखतानुसार बळीराम पुंडलिक इंगळे यास विक्री केलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर खरेदीखतावर विक्री करणार मी स्वतः प्रल्हाद मोतीराम लांडे यांनी सही केलेली असून व माझा भाऊ संदीप मोतीराम लांडे यांच्या तर्फे अपाक आई यांच्या अंगठ्याचा ठसा तसेच सदर खरेदीखतास साक्षीदार म्हणून भाऊराव नामदेवराव लांडे व सदाशिव लांडे यांच्या सह्या आहेत. सदर खरेदीखतातील मजकूर खरा व बरोबर आहे.

मध्यान्हाची वेळ झाली असल्यामुळे साक्षीदाराचा उलटतपास दुपारच्या सत्रापर्यंत तहकुब करण्यात येत आहे.

**दिनांक : ०७.१०.२०२५.**
**ठिकाणः बाळापूर**

**( डी. एम. वाघमारे )**
**सह दिवाणी न्यायाधीश, (क.स्तर),**
**बाळापूर.**

<u>मध्यान्हानंतर प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री. एस. टी. इंगळे यांचे मार्फत पुढील उलटतपास शपथेवर सुरुः</u>

१२. हे म्हणणे खरे आहे की, मौजे पारस येथील शेत सर्व्हे क्र.३३८ पैकी २ एकर १३ गुंठे व शेत सर्व्हे क्र.३००/४ ही जमीन आजतायगत माझ्या ताब्यात नाही. हे म्हणणे खरे आहे की, मौजे पारस येथील शेत सर्व्हे क्र.३३८ पैकी २ एकर १३ गुंठे व शेत सर्व्हे क्र.३००/४ ही जमीन मी विक्री केली आहेत. मी पारस येथील ज्या घरामध्ये सध्या राहतो ते घर माझे वडीलोपार्जीत आहे. त्या घराचा मालमत्ता क्रमांक तसेच नझुल शिट क्रमांक मला सांगता येत नाही. सदर दावा करतेवेळी मी वडीलोपार्जीत मी राहत असलेल्या घराची माहिती घेतलेली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, मी राहत असलेल्या वडीलोपार्जीत घरावर केस करावयाची नसल्याने मी त्याबाबतचे कागदपत्र काढलेली नाहीत.

१३. मी सन १९८० मध्ये एम.एस.ई.बी. निमकर्दा कार्यालयामध्ये नोकरीस लागलो होतो. मी नोकरीस लागल्यानंतर माझे लग्न झाले. मी दि.३०.०६.२०१६ मध्ये एम.एस.ई.बी. च्या नोकरी सेवेतून सेवानिवृत्त झालो. मी सदरचा दावा २०१३ मध्ये दाखल केलेला आहे त्यामध्ये माझा व्यवसाय सेवानिवृत्त असा नमुद केलेला आहे, तो मजकूर खरा नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी जेव्हापासून नोकरीला लागतो तेव्हा पासून मी माझ्या वडीलोपार्जीत घरामध्ये राहत आहे. मी माना, ता. मुर्तिजापूर येथे नोकरी करीत असताना सेवानिवृत्त झालो. मी बाळापूर तालुक्यामध्ये अंदाजे किती वर्षे नोकरी केली हे मला सांगता येत नाही. परंतु माझा बाळापूर तालुक्यामध्ये जास्त काळ नोकरीचा गेला.

१४. हे म्हणणे खरे आहे की, संदीप राहत असलेले घर हे त्याने विकत घेतले आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर दाव्यातील वाद मिळकतीशी माझा कोणताही संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी यांची शेती हडप करण्याच्या उद्देशाने मी सदरचा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या पुराव्याचे प्रतिज्ञापत्र व अतिरीक्त प्रतिज्ञापत्रातील मजकूर हा खोटा नमुद केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादी याच्या विरुध्द खोटी साक्ष दिली आहे.

उलटतपास पूर्ण.
फेरतपास नाही.

दिनांकः– ०७.१०.२०२५

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत

DAYANAND MARUTI WAGHMARE

Digitally signed by DAYANAND MARUTI WAGHMARE
Date: 2025.10.07 16:27:27 +0530

(डी. एम. वाघमारे)
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
बाळापूर

<u>प्रमाणपत्र</u>

मी अधिकथन करतो की, पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णय/आदेश/ पुरावा मधील शब्द नि शब्द हे मुळ न्यायनिर्णय/पुरावा/आदेशाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नाव | :– | **श्री. डी. एम. वाघमारे,**<br>सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बाळापूर. |
| लघुलेखकाचे नाव | :– | अजय एन. हांडे |
| घोषित दिनांक | :– | ०७/१०/२०२५ |
| न्यायनिर्णय/ आदेश/ पुराव्यावर पिठासीन अधिकारी यांनी केलेल्या स्वाक्षरीचा दिनांक | :– | ०७/१०/२०२५ |
| अपलोड केल्याचा दिनांक | :– | ०७/१०/२०२५ |